# नयानगर ते शिवसेना भवनापर्यंत
# मेट्रोचे भुयारीकरण पूर्ण

मुंबई- कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रोच्या कामाचा आज आणखी एक टप्पा पार पडला असून माहिम येथील नयानगर लॉंचिंग शाफ्टमधून भुयारीकरणास प्रारंभ करणाऱ्या कृष्णा १ आणि कृष्णा २ या टनेल बोअरिंग मशीनने (टीबीएम) दादरपर्यंतचे भुयारीकरण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो-३ मार्गिकेचे काम जलदगतीने करण्यात येत आहे. यापूर्वी सिप्झ आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ या दोन ठिकाणी भुयारीकरण (ब्रेक थ्रु) पूर्ण करण्यात आले आहे. आज दादर येथील शिवसेनाभवनापर्यंतचा महत्त्वाचा टप्पा गाठण्यात यश मिळाले आहे. कृष्णा १ आणि २ या दोन टनेल बोअरिंग मशीन नयानगर लॉंचिंग शाफ्ट माहिम येथून अनुक्रमे २१ सप्टेंबर २०१७ आणि १८ ऑक्टोबर २०१७ रोजी भूगर्भात उतरवण्यात आल्या होत्या.